**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक १६ ऑक्टोबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **भ्रष्टाचार, गुन्हेगारी आणि दहशतवादाच्या विरोधात सरकारनं शून्य सहिष्णुता धोरण स्वीकारलं असल्याचं गृहमंत्री अमित शाह यांचं प्रतिपादन.**
2. **खासगी क्षेत्रात आरक्षण लागू करण्याच्या मागणीचा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्याकडून पुनरुच्चार.**
3. **लाखो भीम अनुयायांच्या उपस्थितीत चंद्रपूरच्या दीक्षाभूमीवर ६९व्या धम्मचक्र अनुप्रवर्तन सोहळ्याचं आयोजन.**
4. **राष्ट्रकुल क्रीडा मंडळातर्फे २०३० च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी यजमान शहर म्हणून अहमदाबादची शिफारस.**

---

अमित शाह

देशातल्या सर्व गुन्हेगारांना कायद्याच्या कक्षेत आणण्यासाठी मजबूत यंत्रणा विकसित केली जात असल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. नवी दिल्लीत ते आज 'प्रत्यार्पण: आव्हाने आणि रणनीती' संबंधीच्या परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर बोलत होते. भ्रष्टाचार, गुन्हेगारी आणि दहशतवादाच्या विरोधात सरकारन शून्य सहिष्णुता धोरण स्वीकारलं आहे, याचा पुनरुच्चार त्यांनी केला...........

***(होल्ड बाईट- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा -३४ सेकंद)***

***मोदी जीके नेतृत्व में एक मजबूत भारत सीमाओं की सुरक्षा के साथसाथ रूल ऑफ़ लॉ की मजबूती सुनिश्चित करने के लिए आगे बढ़ रहा है। और आज Global operation, Strong Coordination, Smart diplomacy इन तीनों का समन्वय एक 2 दिन की कार्यशाला में हम सुनिश्चित करने जा रहे हैं। राष्ट्रीय सुरक्षा, देश की आर्थिक समृद्धि और एक प्रकार से।नीतिगत जटिलता से हमें मुक्ति पाने के लिए इस सम्मेलन में हुई चर्चाएं और सुझाए गए उपाय बहुत लाभप्रद होंगे ।***

सरकारन २०१८ मध्ये फरार आरोपींची मालमत्ता जप्त करण्याचा अधिकार देणारा फरार आर्थिक गुन्हेगार कायदा आणला होता. हा कायदा लागू झाल्यानंतर पुढच्या चार वर्षांत दोन अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा अधीक रक्कम वसूल करण्यात आली

आहे. मनी लॉँड्रिंग कायदेही मजबूत करण्यात आले असून त्यामुळे २०१४ ते २०२३ या दरम्यान १२ अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त किमतीची मालमत्ता जप्त करण्यात आल्याचं शहा यावेळी म्हणाले. CBI अर्थात केंद्रीय अन्वेषण संस्थेन दोन दिवसांची ही परिषद आयोजित केली आहे. या परिषदेत विविध केंद्रीय आणि राज्य पोलीस दलाचे  वरिष्ठ पोलीस अधिकारी सहभागी झाले आहेत.

-------------------------------------------

सिंबॉयसिस पुणे

पुण्यात आज सिंबॉयसिस कौशल्य विद्यापीठाचा पदवी प्रदान समारंभ संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत पार पडला. संरक्षण आणि अंतराळ तंत्रज्ञान शाळेचं उद्घाटनही यावेळी करण्यात आलं. संरक्षण संशोधन आणि विकास संस्था - डीआरडीओ इथं सिंह यांच्या उपस्थितीत एक महत्त्वाची बैठक होणार आहे. त्यानंतर ते नाशिकला रवाना होतील. नाशिकमध्ये स्वदेशी बनावटीच्या 'तेजस एमके-वन ए' या लढाऊ विमानाच्या उत्पादनाच्या तिसऱ्या टप्प्याचं उद्घाटन, तसंच ओझर मिनी स्मार्ट टाऊनशिपचं उद्घाटनही राजनाथ सिंह यांच्या हस्ते होणार आहे.

-------------------------------------------

रामदास आठवले

खाजगी क्षेत्रातही मागास वर्गाला आरक्षण मिळायला हवे. अशी भूमिका केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांनी आज नागपूरात घेतलेल्या पत्रकार परिषदेत मांडली. आज सायंकाळी चंद्रपूर इथं होणाऱ्या धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन कार्यक्रमात मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहण्यासाठी ते नागपुरात आले असता प्रसारमाध्यमांशी बोलत होते...........

***(होल्ड बाईट - केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले - ३६ सेकंद)***

***आमच्या पक्षाची मागणी आहे की कॉंट्रॅक्ट पद्धती बंद केली पाहिजे. कॉन्ट्रॅक्ट पद्धतीमुळं एकाच माणसाला अनेक वर्ष तिथंच काम करावं लागत, त्याला पर्मनंट चा फायदा होत नाही आहे  रेग्युलर वर्क ज्या ठिकाणी आहे त्याठिकाणी कॉन्ट्रॅक्ट पद्धत असू नये, सुप्रीम कोर्टाचा ओपिनियन आहे आणि आता सरकारी क्षेत्र सातत्याने प्रायव्हेट होत आहे यामुळे आमच्या पक्षाची मागणी असे आहे की प्रायव्हेट सेक्टर मध्ये रिजर्वेशन दिल पाहिजे.***

8 मार्च २०२६ रोजी आरपीआयचे राष्ट्रीय अधिवेशन नागपुरात होणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. त्याचप्रमाणे मुंबई महानगर पालिकेच्या निवडणुकांत महायुतीच जिंकेल असा विश्वास आठवले यांनी यावेळी व्यक्त

केला. दरम्यान राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज नागपूरच्या रवी भवन इथं केंद्र सरकारच्या योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. अतिवृष्टीमुळे विदर्भात झालेलं नुकसान तसच महानगरपालिकेतील पदभरती याबाबत देखील आढावा घेतला. विदर्भातील 3 लाख 34 हजार हेक्टर कृषी जमिनीचं नुकसान झालं आहे. ३०० कोटी रुपयांच्या नुकसान भरपाईचा प्रस्ताव नागपूर विभागीय आयुक्तांनी राज्य शासनाकडे पाठवला असून त्यातील 37 कोटी प्राप्त झाले असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

---

वारसा जतन

राज्यातील समृद्ध सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी राज्य सरकारकडून मोठा उपक्रम राबविण्यात येत आहे. राज्यातील ५०० मंदिरे, ६० राज्य संरक्षित किल्ले आणि १८०० बारवा अर्थात जलस्रोत यांच्या संवर्धनासाठी बृहद् आराखडा तयार करण्याच्या सूचना सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी दिल्या आहेत. त्या बृहत् आराखडामध्ये त्याचं जतन, संवर्धन आणि यापुढे पर्यटक, फुटफॉल वाढवण याचा समावेश असेल. मैत्रीच्या सोबतीन पुरातत्व विभाग यात नोडल एजन्सी म्हणून काम करेल.

---

राज्य निवडणूक आयुक्त

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मोठ्याप्रमाणात मनुष्यबळाची आवश्यकता असून, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ते प्राधान्याने उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज दिले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तयारी संदर्भात आयोगाच्या कार्यालयात आज वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते.

---

धम्मचक्र अनुप्रवर्तन

गौतम बुद्धाचा धम्म संदेश आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा ठेवा आत्मसात करण्यासाठी राज्यसह देश - परदेशातील लाखो बौद्ध अनुयायी आज चंद्रपूरच्या पवित्र दीक्षाभूमीवर ६९ व्या धम्मचक्र अनुप्रवर्तन सोहळ्यासाठी जमले आहे. दर वर्षी १५ आणि १६ ऑक्टोबर रोजी हा दोन दिवसीय सोहळा चंद्रपूर इथल्या दीक्षाभूमीवर साजरा केला जातो. यातील पहिल्या दिवशी अनुप्रवर्तन

सोहळ्याचं  विधिवत उद्घाटन झालं. तर दुसऱ्या दिवशी अर्थात आज मुख्य सोहळा, मिरवणूक, परिसंवाद, सामूहिक बुद्धवंदना, भीम गीतांच्या कार्यक्रमाचं  आयोजन करण्यात आलं आहेत. या सोहळ्यासाठी लाखो भाविक दीक्षाभूमी इथं दाखल झाले आहे.

---------------------------------------------

दादाजी भुसे

राज्यातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण आणि आनंददायी शिक्षण देण्यासाठी उद्योगांनी सीएसआर अर्थात सामाजिक उत्तरदायित्व निधीचा वापर शाळांच्या गरजेनुसार करावा, असं  आवाहन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केलं. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या कार्यालयात विविध उद्योगांच्या सीएसआर प्रमुखांसोबत झालेल्या बैठकीत ते बोलत होते. शाळांमध्ये शिक्षकांबरोबरच स्वच्छ स्वच्छतागृहे, पिण्याचे शुद्ध पाणी, प्रयोगशाळा, आणि इमारती यांसारख्या सुविधांची गरज आहे. 'विद्यांजली' पोर्टलवर शाळांच्या आवश्यकतांची माहिती उपलब्ध असून उद्योगांनी त्याचा आधार घेऊन आपलं  योगदान द्यावं, असं आवाहन भुसे यांनी केलं.

---------------------------------------------

अतिरिक्त बस भाडे

दिवाळी सणानिमित्त राज्यभरातील नागरिक मोठ्या प्रमाणात गावी येत-जात असल्यान खाजगी प्रवासी बसेसची मागणी वाढली आहे. त्यामुळे  काही खासगी बसचालकांकडून मनमानी भाडेवाढ आकारण्याची शक्यता आहे. प्रवाशांची लुबाडणूक होऊ नये, यासाठी राज्य शासनान २७ एप्रिल २०१८ रोजी जारी निर्णयानुसार खाजगी कंत्राटी प्रवाशी वाहनांचे कमाल भाडेदर निश्चित केले आहेत. यानुसार राज्य मार्ग परिवहन महामंडळ गाड्यांच्या  प्रती किलोमीटर भाडेदराच्या  ५० टक्क्यांपेक्षा जास्त दर, खाजगी बस आकारू शकत  नाहीत.

---------------------------------------------

राष्ट्रकुल क्रीडा

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा कार्यकारी मंडळान २०३० च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी यजमान शहर म्हणून भारताच्या अहमदाबादची शिफारस करण्याचा निर्णय घेतला आहे, असं राष्ट्रकुल क्रीडा मंडळानं  म्हटलं आहे. २०२६ च्या ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतून काढून टाकलेले सर्व खेळ २०३० मध्ये समाविष्ट केले जातील. यामध्ये नेमबाजी, कुस्ती, बॅडमिंटन, हॉकी, तिरंदाजी, कबड्डी आणि खो-खो यांचा समावेश असेल.

---------------------------------------------

मिशन उडान

अकोला जिल्ह्यात मिशन उडान अंतर्गत महिला आणि बालक सुरक्षेसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांच्या अनुषंगान अकोला पोलीसांच्या एसजेपीयु (SJPU) पथक आणि पोलीस काका - पोलीस दिदी यांची कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेला जिल्हा बाल कल्याण समिती सदस्या प्रांजली जयस्वाल यांनी मार्गदर्शन केलं. त्यांनी बालकांसोबत संवाद साधताना बालस्नेही दृष्टिकोन ठेवण्याच आणि तपासादरम्यान येणाऱ्या अडचणींवर योग्य पद्धतीन मात करण्याच यावेळी सांगितलं.

---------------------------------------------

शेअर बाजार

अमेरिकन फेडरल रिझर्व्ह कडून दर कपातीची अपेक्षा, जागतिक बाजारातलं सकारात्मक वातावरण यामुळं सलग दुसऱ्या दिवशी देशातल्या शेअर बाजारात जोरदार तेजी आहे. सकाळपासून असलेली तेजी दुपारपर्यंत आणखी वाढत गेली. बँका, माहिती तंत्रज्ञान कंपन्या, ग्राहकोपयोगी वस्तू निर्माण करणाऱ्या कंपन्यांचे समभाग आज तेजीत आहे.

---------------------------------------------